गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. लमंपु १३२६(१३)/प्र. क्र.३२१(ई.क्र.१७६३६३२)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा</u> :-१) समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. सांकासं १०९२/प्र.८२/ सां. का.१, दिनांक १३ सप्टेंबर, १९९३

२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. लमंपु १३२२(१३)/प्र.क्र.३८९/सां.का.४, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२

३) सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सांकसं/२२९८, दिनांक २० जुलै, २०२६

<u>प्रस्तावना</u> :-

उपर्निर्दिष्ट १ अन्वये, गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या जन्मदिनी त्यांच्या नावे गायन व संगीत या क्षेत्रात प्रदीर्घ कार्य केलेल्या मान्यवरांना लता मंगेशकर यांच्या नावे पुरस्कार देऊन गौरविण्याची योजना सन १९९३ पासून सुरु आहे. सदर पुरस्कारासाठी मान्यवरांची निवड करण्यासाठी पुरस्कार निवड समिती संदर्भ क्र. २ अन्वये गठीत करण्यात आलेली होती. तथापि, सदर समितीचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने नवीन निवड समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार निवड समितीची पुनर्रचना खालीलप्रमाणे करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे :-

अ) शासकीय सदस्य

१.	मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य	अध्यक्ष
२.	सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग	सदस्य
३.	संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय	सदस्य सचिव

ब) अशासकीय सदस्य

१)	श्रीमती अनुराधा पौडवाल	सदस्य
२)	श्री. कमलेश भडकमकर	सदस्य
३)	श्री. उदित नारायण	सदस्य
४)	श्री. कुमार सानू	सदस्य
५)	श्री. सोनू निगम	सदस्य
६)	श्री. सुरेश वाडकर	सदस्य

नव्याने गठीत केलेल्या समितीची मुदत या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ वर्षापर्यंतच्या कालावधीसाठी किंवा शासनाचे पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत असेल.

०२. **प्रवास व बैठक भत्ता :-** समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता व बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

०३. यावरील खर्च “मागणी क्र. झेडडी-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०४) इतर महोत्सव, (०४) (०१) इतर महोत्सव (२२०२ १६०५) ५०, इतर खर्च” या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या त्या-त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

०४. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी व लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८०७१६३३४७८२४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP SOPAN
SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS,
2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.08.07 16:35:14 +05'30'

(दिलीप सो. सोळसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकामे (सार्वजनिक उपक्रम वगळता) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन, क्रीडा व युवा कल्याण आणि अल्पसंख्यांक व औकाफ यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
८. सर्व अशासकीय सदस्य (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१ महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) -१ महाराष्ट्र, मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
१५. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१६. निवड नस्ती, सां.का.४